## DIECPD परभणी व शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी

# अध्ययन निष्पत्ती नैदानिक चाचणी २०१९

**वर्ग ४ वा** **वेळ : १ तास** **गुण : २५**

**विद्यार्थ्याचे नाव :** ____________________ **ह.क्र. (  )**

**शाळेचे नांव :** ____________________ **ता.**__________ **जि.परभणी**

**चाचणी सोडवण्यापुर्वी सुलभकाने विद्यार्थ्यांना खालील सुचनांप्रमाणे मार्गदर्शन करावे.**

सुचना : १) दिलेल्या पर्यायामधून प्रश्नाचे उत्तर शोधण्याबाबत विद्यार्थ्यांना निर्देशित करा.

२) योग्य पर्यायाला गोल करा.

प्रश्नाचे उत्तर कसे नोंदवायचे / गोल करायचे हे विद्यार्थ्यांना फळ्यावर उदाहरण देऊन स्पष्ट करा.

प्रश्न : दिलेल्या ३६, २८, ४१ आणि ५९ या संख्यापैकी कोणती संख्या सर्वात मोठी आहे ?

१) ३६ २) २८ (३) ५९ ४) ४१

**विषय : मराठी**

1) **खालील उतारा वाचून प्रश्नाचे उत्तर लिहा.**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात ‘चवदार तळे’ नावाचे एक तळे आहे. स्वातंत्र्यापूर्वी या तळ्यावर इतर ठिकाणांप्रमाणे दलितांना पाणी भरण्याची बंदी होती. ‘ सर्व लोकांना पाणी मिळावे ’ असा कायदा करुनही जातिभेदांमुळे दलितांना चवदार तळ्याच्या पाण्याला हात लावण्याची देखील मनाई होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या जुलमी रुढीचा धिक्कार केला. ‘ चवदार तळे ’ सर्वांना खुले व्हावे, म्हणून त्यांनी महाड येथे सत्याग्रह केला. हजारो लोकांच्या उपस्थितीत २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी स्वत: तळ्याचे पाणी पिऊन एक अन्यायी परंपरा संपवली. दलितांबरोबर सवर्ण सुधारक देखील या लढ्यात सहभागी झाले होते. अस्पृश्यता पाळणे, माणसांनी एकमेकांना हीन लेखणे अशा विषमतेच्या परंपरांना डॉ. आंबेडकरांनी संघटित विरोध केला. स्त्रियांना, दलितांना समतेने, समानतेने जगण्याचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अपार संघर्ष केला. ‘चवदार तळे’ ही जागा अशाच एका प्रसंगाची साक्षीदार आहे.

‘ चवदार तळ्याचा सत्याग्रह ’ ही घटना भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी घटना मानली जाते.

**डॉ. आंबेडकरांनी समस्या सोडविण्यासाठी कोणता मार्ग वापरला ?** (410)

1) उपोषण 2) सत्याग्रह 3) मुकमोर्चा 4) संप

2) **‘जंगलातील खाऊ’ या अर्थाने आलेला शब्द खालील पैकी कोणता ?** (412)

1) रानमेवा 2) खवा 3) रवा 4) रानगवा

3) **खालीलपैकी जोडशब्द नसलेला शब्द ओळखा.** (413)

1) कांदा भाकर 2) काळा सावळा 3) काना कोपरा 4) काळसर

4) **खनिज मिठासाठी वापरण्यात येणारा योग्य शब्द खालीलपैकी कोणता ?** (407)

1) खारट 2) सैंधव मीठ 3) खारे मीठ 4) मिठाचा दगड

5) एका गावातील एक सुतार रोज जंगलात जात असे. एकदा त्याने खड्डयात पडलेल्या जंगली कुत्र्याच्या पिल्ल्याचा जीव वाचवला. तेव्हापासून त्याला त्या पिल्ल्याचा लळा लागला. ते पिल्लू त्याला तेथे रोज भेटत होते. ते पाहून इतरही जंगली कुत्रे त्याच्या जवळ येत असत परंतू त्यांना सर्वांना एका वाघाने फार त्रस्त करुन सोडले होते. तो रोज त्यांच्यावर हल्ले करत होता. सुताराने एक योजना राबवली. नेहमी प्रमाणे वाघ डोंगराच्या माथ्यावर आला. सर्व कुत्री वेगवेगळ्या ठिकाणी थांबून त्याच्यावर भुंकू लागली. वाघाने चवताळून एका कुत्र्यावर झेप घेतली. तसा तो कुत्रा खाली बसला. वाघाची उडी थेट त्या कुत्र्याच्या मागे असणाऱ्या एका मोठ्या खड्डयात पडली. सगळ्या कुत्र्यांनी त्याच्यावर धाव घेतली व त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार केले.

**वरील गोष्टीस कोणती म्हण लागू पडेल.** (406)

1) वासरात लंगडी गाय शहाणी
2) आयत्या बिळात नागोबा.
3) गर्वाचे घर खाली.
4) एकीचे बळ मिळते फळ.

## विषय : गणित

6) **निशाच्या घराच्या वीजमिटर मध्ये 1 जूनला | 0 | 3 | 4 | 5 | 2 | असे वाचन होते. 1 जुलैचे वाचन | 0 | 3 | 5 | 3 | 1 | झाले , तर जून महिन्यात किती युनिट विजेचा वापर झाला ? (401)**

1) 69 2) 79 3) 59 4) 89

7) **खाली दिलेल्या आकृतीमधील रंगवलेला भाग कोणत्या अपूर्णांकाने दाखवाल ? (406)**

1) $\frac{7}{2}$ 2) $\frac{7}{7}$

3) $\frac{2}{7}$ 4) $\frac{5}{7}$



8) **पावणे दोन मीटर म्हणजे किती सेंटीमीटर ? ( 413 )**

1) 75 सेमी 2) 150 सेमी 3) 125 सेमी 4) 175 सेमी

9) **परभणीहून सकाळी 6 वाजून 45 मी. सुटलेली बस जालन्याला सकाळी 10 वाजून 10 मि. पोहचली, तर त्या प्रवासाला किती वेळ लागला ? ( 416 )**

1) 3 तास 25 मी 2) 4 तास 25 मी 3) 2 तास 25 मी 4) 3 तास 15 मी

10) **आकृतीमधील आयत ECDF ची परिमिती किती ? ( 412)**

1) 16 सेमी
2) 14 सेमी
3) 12 सेमी
4) 15 सेमी




1 सेमी

## विषय : इंग्रजी

**11) Use correct punctuation mark and complete the sentence (412)**

**What is your wish**

1) **.** 2) **?** 3) **!** 4) **,**

**12) Find the word that shows action. ( 415)**

1) blue 2) speak 3) wife 4) home

**13) Tick the proper word from the table ( 409)**

1) hat
2) wat
3) bat
4) fan

| | | |
|---|---|---|
| s | t | n |
| c | a | d |
| p | b | m |

**14) Who is Maya ? ( 423)**

1) Doctor
2) Tailor
3) Housewife
4) Milkmaid



**15) Complete the following word with the help of the story ' The Golden Fish '. ( 410)**

**Fisher ...............**

1) man 2) van 3) fan 4) can

## विषय : विज्ञान

16) **कोणत्या दिवशी 12 तासांचा दिवस व 12 तासांची रात्र असते. ? (411)**

1) 21 जून 2) 21 मार्च 3) 22 डिसेंबर 4) 7 जून

17) **सूर्याच्या मावळण्याला ............ म्हणतात. ( 410)**

1) सुर्योदय 2) दुपार 3) सूर्यास्त 4) रात्र

**18) खालीलपैकी मानवनिर्मित साधन कोणते आहे ? ( 413)**

1) डोंगर 2) मोबाईल 3) पाणी 4) हवा

**19) विवाह, जन्ममृत्यू व स्थलांतर यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांची संख्या......... ( 403)**

1) कमी होत राहते 2) अधिक होत राहते 3) कमी अधिक होत राहते 4) बदलत नाही

**20) तुम्ही व तुमचा मित्र शेतात गेले असता त्याला ( मित्राला ) अचानक साप चावला असेल तर तुम्ही काय कराल.(414)**

1) त्याला मांत्रिकाकडे घेऊन जाऊ . 2) त्याला तिथेच सोडून देऊ.
3) त्याला डॉक्टरकडे घेऊन जाऊ . 4) त्याला घरी घेऊन जाऊ.

## विषय : सामाजिक शास्त्रे

**21) घोडखिंड इतिहासात कोणत्या नावाने अमर झाली ? ( 419)**

1) बाजीप्रभू खिंड 2) पावनखिंड 3) गणेशखिंड 4) शिवखिंड

**22) शिवरायांनी सुरतेवर छापा घातला कारण...... ( 419)**

1) आदिलशहावर वचक बसविण्यासाठी 2) स्वराज्य वाढविण्यासाठी
3) दारूगोळा व संपत्ती मिळविण्यासाठी 4) औरंगजेब बादशहावर जबर वचक बसविण्यासाठी

**23) तानाजीच्या भावाचे नाव काय होते ? ( 419)**

1) रायबा 2) सूर्याजी 3) मुरारबाजी 4) फिरंगोजी

**24) शिवरायांना लाल महालाची खडानखडा माहीती का होती ? ( 418)**

1) शिवरायांनी लाल महाल बांधला होता. 2) शिवरायांनी लाल महाल जिंकला होता.
3) शिवरायांचे बालपण लाल महालात गेले होते. 4) वरील सर्व बरोबर.

**25) ' रमेश घरातील आई, लहान बहीण, आजी, शेजारील काकू यांच्याशी सन्मानाने बोलतो. '**
**यावरून रमेशने शिवरायांच्या चरित्रातून खालीलपैकी कोणता गुण आत्मसात केला. ( 418)**

1) स्त्रियांचा आदर करणे 2) कुटुंबावर प्रेम करणे
3) थोरांच्या आज्ञा पाळणे 4) स्त्री, पुरूष समानता

---

**(कच्च्या कामासाठी जागा)**